MHNS160010502022

**आदेश नि.क्रं. ०५ खाली**

**दिनांक ०२/०५/२०२६**

**(१)** वादींनी सदरचा दावा सरस निरसमानाने वाटप होउन तुटक कब्जा मिळणेसाठीचा व निरंतरचा ताकिद हुकूम मिळण्यासाठी दाखल केला असुन सदरच्या दाव्यात वादींनी प्रतिवादीविरुध्द नि.क्रं. ०५ खाली दावा मिळकत प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे नावे व कब्जात असले कारणाने गैरफायदा घेउन प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी त्रयस्थ इसमास अगर कुणासही दावा मिळकत साठेखत, इसारपावती, खरेदी, विक्री गहाण दान, बक्षिस, मृत्यूपत्र वगैरे तबदिलीच्या लेखाने तबदिल करु नये किंवा दावा मिळकतीवर कोणत्याही वित्तीय संस्थेचे बोजे निर्माण करु नये या करीता तात्पुरता ताकिद मनाई हुकूमा करीता सदर अर्ज दाखल केला आहे.

**(२)** वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, मिळकतीचे वर्णन – तुकडी जि. प. नाशिक पोट तुकडी तालुका पंचायत समिती चांदवड पैकी मौजे उसवाड या गावचे शिवारातील शेतजमीनीचे वर्णन येणेप्रमाणे

**(अ)** गट क्रं.१४८ यांसी क्षेत्र हे १.२७ आर, पो.ख.०० हे ०१ आर, अशी एकूण हे. ०१.२८ आर, आकार रुपये २.७५ पैसे, यापैकी दावामिळकतीचे क्षेत्र हे ००.४० आर, रु. ००.८७ पैसे यांसी चतुःसिमा :

**पूर्वेस :–** सामाईक रस्ता व गट क्र. २५१,

**पश्चिमेस :–** गट क्रं.२५३ व नाला,

**उत्तरेस :–** गट क्रं.२५०/१

**दक्षिणेस :–** गट क्रं.२५३.

**(ब)** गट क्रं.२९५ यांसी क्षेत्र हे ००.२५ आर, आकार रुपये ०.२६ पैसे, यांसी

**पूर्वेस :–** सामाईक रस्ता व गट क्र. २५,

**पश्चिमेस :–** गट क्रं.२५३ व नाला,

**उत्तरेस :–** गट क्रं.२५०/१

**दक्षिणेस :–** गट क्रं.२५३.

**(क)** गट क्रं.२९९ यांसी क्षेत्र हे ०.२५ आर, आकार रुपये ०.३४ पैसे, यांसी चतुःसिमाः–

**पूर्वेस :–** सामाईक रस्ता व गट क्र. २५,

**पश्चिमेस :–** गट क्रं.२५३ व नाला,

**उत्तरेस :–** गट क्रं.२५०/१

**दक्षिणेस :–** गट क्रं.२५३.

**(ड)** गट क्रं.३२४ यांसी क्षेत्र हे ०.६२ आर, पो.ख.०० हे ०५ आर, अशी एकूण हे. ०.६७ आर, आकार रुपये ०.७५ पैसे, यापैकी दावामिळकतीचे क्षेत्र हे ००.२८ आर, रु. ००.३४ पैसे यांसी चतुःसिमा :

**पूर्वेस :–** सामाईक रस्ता व गट क्र. २५१,

**पश्चिमेस :–** गट क्रं.२५३ व नाला,

**उत्तरेस :–** गट क्रं.२५०/१

**दक्षिणेस :–** गट क्रं.२५३.

येणेप्रमाणे मिळकत जलतरु, काष्टपाषण इत्यादी तदंगभूत वस्तूसह दरोबस्त मिळकत. सदर मिळकतीस स्पष्टता येण्याकरीता यापुढे **दावा मिळकत** असे संबोधण्यात येते.

**(३)** वादींनी पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकत ही मयत धना सखाराम बटाव यांच्या वडीलोपार्जीत मालकीच्या व कब्जेवहीवाटीच्या अशा असुन मयत धना सखाराम बटाव व त्यांचे भाऊ मयत फुला सखाराम बटाव व मयत सोनु सखाराम बटाव यांचेदरम्यान आपआपसांत दि.०१.०६.२००२ रोजी

वाटप झालेले असुन त्यानुसार दावा मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला वाटप फेरफार नोंद क्र. ९६६ ही मंजुर झाली असुन त्यानंतर गावी धना सखाराम बटाव हे मयत झालेने मयत दामु धना बटाव व दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ते ६ यांची नावे कायदेशिर वारस म्हणुन दावा मिळकतीत शामील झालेले असुन मयत दामु धना बटाव हा मयत धना सखाराम बटाव यांचा मयत मुलगा असुन दाव्यातील वादी हे मयत दामु धना बटाव यांचे कायदेशिर वारस असुन दाव्यतील प्रतिवादी क्र.१ ते ४ हे मयत धना सखाराम बटाव यांची मुले व प्रतिवादी क्र.५ व क्र.६ या व मयत ताराबाई या मुली असुन प्रतिवादी क्र. ७ ते १२ या हे मयत ताराबाई यांचे कायदेशिर वारस आहे असे कथन केले आहे.

(४) वादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान आजपावेतो दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप झालेले नाही पंरतु वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे दरम्यान आपआपसांत ठरलेनुसार दावामिळकतीचे तोंडी वाटप झालेले असुन सदरचे वाटप हे सरस निरस मानाने झालेले नाही तसेच वादी क्र. १ यांचे मयत वडील दामु धना बटाव यांना तोंडी वाटपानुसार आलेल्या मिळकतीत वादी क्र.१ यांनी सुधारणा करून त्यात पाण्याचे स्त्रोत निर्माण करून जमीनीची सुपीकता वाढविली असुन वादी क्र.१ यांचे मयत वडील नामे दामु धना बटाव यांनी त्यांचे हयातीत प्रतिवादी क्र. १ ते ६ व प्रतिवादी क्र. ७ ते १२ यांची मयत आई नामे ताराबाई यांचेकडे वेळोवेळी दावा मिळकतीचे तोंडी वाटपानुसार असलेले हिस्यांचे वादी क्र.१ यांचे मयत वडील नामे दामु धना बटाव व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे दरम्यान कायदेशिर कागदोपत्री वाटप करून मागितले असता प्रतिवादी क्र.१ ते ६ व मयत ताराबाई यांनी कायदेशिर वाटप करून दिले नाही असे कथन केले आहे.

(५) वादींनी पुढे असे कथन केले आहे की, त्यानंतर वादी क्र. १ यांचे वडील नामे दामु सखाराम बटाव हे गावी मयत झाल्यानंतर वादी यांची नावे कायदेशिर वारस म्हणुन दावा मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला शामील झालेले असुन त्यानंतर वादींनी दि. ०१ जुन २०२२ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेकडे दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप करून कागदोपत्री रेकॉर्ड करण्याची मागणी केली असता प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वादींन स्पष्ट नकार दिला म्हणुन वादींना प्रस्तुतचा दावा मे. न्यायालयात दाखल करणे भाग झाले आहे असे कथन केले आहे.

(६) वादींनी पुढे असे कथन केले आहे की, दावामिळकतीचे वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचेत सरस निरस मानाने वाटप करण्यात येऊन वादीचा दावामिळकतीमध्ये असलेला १/५ हिस्सा वादीस प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेकडुन अलग व तुटक करून त्याचा प्रत्यक्ष कब्जा मिळणेसाठी व दाव्यातील मिळकती प्रतिवादी यांचे नावावर बेकायदेशिर आहे याचा गैरफायदा घेऊन त्या कोणालाही साठेखत, इसारपावती, खरेदी-विकी, गहाण दान बक्षिसपत्र. मृत्युपत्र वैगरे तबदीलीच्या लेखाने तबदीली करू नये व दावामिळकतींवर कर्जाचे बोजे निर्माण करू नये अशी निरंतरची ताकीद प्रतिवादी यांना देवविण्यासाठी सदरचा दावा दाखल केला आहे असे कथन केले आहे.

(७) वादींनी पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.५ ते १२ यांचा कब्जा नसुन प्रतिवादी क्र.५ ते १२ हे वादी क्र.१ यांच्या बहिणी व त्यांचे मुले असुन वादींची त्यांचे विरूध्द काही एक मागणी नसुन दाव्यात गुण दोष राहु नये या कारणाने प्रस्तुत दाव्यात त्यांना प्रतिवादी म्हणुन शामील केलेले आहे असे कथन केले आहे.

(८) वादींनी पुढे असे कथन केले आहे की, सकृत दर्शनी वादीस चांगली केस असुन न्यायाचे समतोलत्व वादींचे लाभात आहे ते प्रतिवादी क्र. १ ते ४यांचे लाभात नाही तरी वादीचे लाभात प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे विरूध्द निरंतरची ताकीद देववावी तसी न दिल्यास त्याचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी क्र.१ ते ४हे दाव्यातील या मिळकती बेकायदेशिरपणे अयस्थास तबदिली करून टाकतील अथवा मिळकतीवर कर्जाचे बोजे निर्माण करतील त्यामुळे वादीचे कधीही न भरून येईल असे अपरिमीत नुकसान होईल व वादीस त्याचे न्याय हक्कापासुन वंचित व्हावे लागेल याउलट प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे काहीएक नुकसान अथवा हार्डशिप होणार नाही तरी वादीचे लाभात प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे विरूध्द निरंतरचा ताकीद हुकूम देवविण्यात यावा अशी विनंती केली आहे.

(९) प्रतिवादींना दाव्याचे समन्स पाठविले व ते या प्रकरणात वकिलामार्फत हजर झाले मात्र त्यांनी त्यांची लेखी कैफियत जवाब दाखल केला नाही. नि. क्रं. १ वरील दिनांक २३/०१/२०२४ आदेशावरुन सदरचे प्रकरण प्रतिवादींविरुध्द विना कैफियत व विना जवाब चालविण्यात आले.

(१०) युक्तीवाद ऐकला. दाव्यात दाखल केलेली कागदपत्रे पाहिली. वरील परिस्थितीत माझ्यासमोर खालील प्रश्न उपस्थित होतात. त्या प्रश्नांचा कारणांसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादींनी आपले म्हणणे सकृतदर्शनी (Prima-facie case ) सिध्द केले आहे काय ? | ... होकारार्थी. |
| २ | न्यायाचे समतोलत्व (Balance of convenience) वादींचे बाजुने आहे काय ? | होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ३ | तुर्तातुर्त मनाईचा आदेश न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान (irreparable loss) होणार आहे हे वादीने सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी. |
| ४ | कोणता आदेश ? | अंतिम ओदशानुसार. |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्र. १ ते ३ करीताः–**

**(११)** वादीचे तज्ञ वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दस्तऐवजांचे अवलोकन केले. वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकत ही मयत धना सखाराम बटाव यांच्या वडीलोपार्जीत मालकीच्या व कब्जेवहीवाटीच्या अशा असुन मयत धना सखाराम बटाव व त्यांचे भाऊ मयत फुला सखाराम बटाव व मयत सोनु सखाराम बटाव यांचेदरम्यान आपआपसांत दि.०१.०६.२००२ रोजी वाटप झालेले असुन त्यानुसार दावा मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला वाटप फेरफार नोंद क्र. ९६६ ही मंजुर झाली असुन त्यानंतर गावी धना सखाराम बटाव हे मयत झालेने मयत दामु धना बटाव व दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ते ६ यांची नावे कायदेशिर वारस म्हणुन दावा मिळकतीत शामील झालेले असुन मयत दामु धना बटाव हा मयत धना सखाराम बटाव यांचा मयत मुलगा असुन दाव्यातील वादी हे मयत दामु धना बटाव यांचे कायदेशिर वारस असुन दाव्यतील प्रतिवादी क्र.१ ते ४ हे मयत धना सखाराम बटाव यांची मुले आहे असे कथन केले आहे.

**(१२)** वादीचे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान आजपावेतो दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप झालेले नाही पंरतु वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे दरम्यान आपआपसांत ठरलेनुसार दावामिळकतीचे तोंडी वाटप झालेले असुन सदरचे वाटप हे सरस निरस मानाने झालेले नाही तसेच वादी क्र. १ यांचे मयत वडील दामु धना बटाव यांना तोंडी वाटपानुसार आलेल्या

मिळकतीत वादी क्र.१ यांनी सुधारणा करून त्यात पाण्याचे स्त्रोत निर्माण करून जमीनीची सुपीकता वाढविली असुन वादी क्र.१ यांचे मयत वडील नामे दामु धना बटाव यांनी त्यांचे हयातीत प्रतिवादी क्र. १ ते ६ व प्रतिवादी क्र. ७ ते १२ यांची मयत आई नामे ताराबाई यांचेकडे वेळोवेळी दावा मिळकतीचे तोंडी वाटपानुसार असलेले हिस्यांचे वादी क्र.१ यांचे मयत वडील नामे दामु धना बटाव व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे दरम्यान कायदेशिर कागदोपत्री वाटप करून मागितले असता प्रतिवादी क्र.१ ते ६ व मयत ताराबाई यांनी कायदेशिर वाटप करून दिले नाही असे कथन केले आहे.

(१३) वादीचे असे कथन आहे की, त्यानंतर वादी क्र. १ यांचे वडील नामे दामु सखाराम बटाव हे गावी मयत झाल्यानंतर वादी यांची नावे कायदेशिर वारस म्हणुन दावा मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटसला शामील झालेले असुन त्यानंतर वादींनी दि. ०१ जुन २०२२ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेकडे दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप करून कागदोपत्री रेकॉर्ड करण्याची मागणी केली असता प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वादींन स्पष्ट नकार दिला म्हणुन वादींना प्रस्तुतचा दावा मे. न्यायालयात दाखल करणे भाग झाले आहे असे कथन केले आहे.

(१४) वादींनी पुढे असे कथन केले आहे की, दावामिळकतीचे वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचेत सरस निरस मानाने वाटप करण्यात येऊन वादीचा दावामिळकतीमध्ये असलेला १/५ हिस्सा वादीस प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेकडुन अलग व तुटक करून त्याचा प्रत्यक्ष कब्जा मिळणेसाठी व दाव्यातील मिळकती प्रतिवादी यांचे नावावर बेकायदेशिर आहे याचा गैरफायदा घेऊन त्या कोणालाही साठेखत, इसारपावती, खरेदी–विकी, गहाण दान बक्षिसपत्र. मृत्युपत्र वैगरे तबदीलीच्या लेखाने तबदीली करू नये व दावामिळकतींवर कर्जाचे बोजे निर्माण

करू नये अशी निरंतरची ताकीद प्रतिवादी यांना देवविण्यासाठी सदरचा दावा दाखल केला आहे असे कथन केले आहे.

(१५) वादींनी पुढे असे कथन केले आहे की, सकृत दर्शनी वादीस चांगली केस असुन न्यायाचे समतोलत्व वादींचे लाभात आहे ते प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे लाभात नाही तरी वादीचे लाभात प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे विरूध्द निरंतरची ताकीद देववावी तसी न दिल्यास त्याचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी क्र.१ ते ४हे दाव्यातील या मिळकती बेकायदेशिरपणे अयस्थास तबदिली करून टाकतील अथवा मिळकतीवर कर्जाचे बोजे निर्माण करतील त्यामुळे वादीचे कधीही न भरून येईल असे अपरिमीत नुकसान होईल व वादीस त्याचे न्याय हक्कापासुन वंचित व्हावे लागेल याउलट प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे काहीएक नुकसान अथवा हार्डशिप होणार नाही तरी वादीचे लाभात प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे विरूध्द तात्पूरता ताकीद हुकूम देवविण्यात यावा अशी विनंती केली आहे.

(१६) वादींनी त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, मिळकती या वादी व प्रतिवादी यांचे संयुक्त मालकी हक्काच्या व कब्जे वहीवाटीच्या असून वारसाने आलेल्या आहे. वादींनी त्यांच्या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची सामाईक जमीन आहे. सदर वादी व प्रतिवादी यांचेत सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. उभय पक्षांचा वादमीळकतीत हिस्सा आहे किंवा कसे इत्यादी बाबी पुराव्याअंती शाबीत होणार आहे. याउलट, प्रतिवादीं एकतर्फा असल्याने त्यांनी वादीचे कथनाला कोणतेही आव्हाण दिलेले नाही.

(१७) वादींनी अभिलेखावर दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यानुसार वाद मिळकत ही प्रतिवादींच्या नावे महसूल अभिलेखात नोंद आहे. त्या आधारे प्रतिवादी क्र. १ ते ४ वाद मिळकतीत तृतीय पक्षाचा हक्क व अधिकार निर्माण करु शकतात असे वादीने कथन केले आहे. वादीने प्रतिवादी क्र. १ ते ४

यांनी वाद मिळकतीत तृतीय पक्षाचा हक्क व अधिकार निर्माण करण्यापासून थांबविण्या करीता तात्पूरता मनाई हुकूमाचा अर्ज दिला आहे व तो मंजूर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादीं एकतर्फा असल्याने त्यांनी वादीचे कथनाला कोणतेही आव्हाण दिलेले नाही. निश्चितपणे वादीची प्रथमदर्शनी केस स्पष्टपणे सिध्द होते. वरील विवेचनाप्रमाणे प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुने असून न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने झुकताना दिसतो. तसेच, जर तुर्तातुर्त मनाई हूकूमाचा आदेश पारीत केला नाही तर दाव्याची गुंतागुंत वाढू शकते व वादीचे कशानेही न भरुन निघणारे नुकसान होणार आहे. म्हणुन वरील सर्व बाबींचा विचार करता मी प्रश्न क्रं. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवून तात्पुरता मनाईहुकूम वादीच्या हक्कात देणे न्यायोचित समजतो व प्रश्न क्रं. ४ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज नि.क्रं. ०५ मंजुर करण्यात येतो. |
| २. | दाव्याचा अंतिम निर्णय होई पावेतो प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दावा मिळकत कोणासही कोणत्याही मार्गाने तबदील करु नये अगर तबदीली बाबतचे कोणतेही व्यवहार करु नये, तृतीय पक्षाचा हक्क अधिकार निर्माण करु नये व दावा मिळकतीवर कोणतेही कर्ज बोजे निर्माण करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादी व सर्व संबंधीतांना देण्यात येते. |
| ३. | खर्चाबाबत निर्णय अंतिम निकालाच्यावेळी घेण्यात यावा. |

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.05.02 16:49:32 +0530

ठिकाण : चांदवड.

**(एस. एस. छल्लाणी)**

दिनांक : ०२/०५/२०२६.

दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, चांदवड.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करते की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | ***नामदेव एम. शेडगे,***<br>लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नाव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्या.क्र.१), चांदवड. |
| न्यायनिर्णयाची तारीख | :– | ०२/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | ०२/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | ०२/०५/२०२६ |